ठाणेवैभव

# रोटरी क्लब ऑफ कल्याण तर्फे "आठवणीतले खेळ"




**कल्याण :** रोटरी क्लब ऑफ कल्याणतर्फे नूतन विद्यालय कल्याण पश्चिम येथे अभिनव उप्रकम राबवण्यात आला. हा उपक्रम वय वर्ष 7 ते 15 वयोगटातील विद्यार्थ्यांना मोबाईलपासून दूर ठेवण्यासाठी व मैदानी खेळाची आवड निर्माण होण्यासाठी "आठवणीतले खेळ" चला मोबाईल विसरुया मैदानी खेळ खेळूया हा कार्यक्रम हाती घेण्यात आला होता.

या ठिकाणी मुलांना खेळण्यासाठी गोट्या, विटी दांडू, भवरा, लगोरी, आबा दुबी, माझ्या मामाचं पत्र हरवलं, रुमाल पळवणे, आंधळी कोशिंबीर, गाडा चालवणे, कुलूप किल्ली असे विविध खेळ रोटरी क्लब कल्याणतर्फे घेण्यात आले. मुलांनी त्याचा मनमुराद आनंद लुटला. पालक व शिक्षकांनी त्यांना यथायोग्य खेळाचे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमासाठी क्लब प्रेसिडेंट पराग कापसे, सचिव आत्माराम घाणेकर, अरुण सपकाळे, विनोद सिंग, माजी प्रांतपाल मिलिंद कुलकर्णी, माधवी कुलकर्णी, दिलीप कर्डेकर, जयश्री कर्डेकर, सी. बी. कुलकर्णी, रोहन गोळे, रेश्मा सय्यद, हनीफ सय्यद यांनी परिश्रम घेतले.